# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यंचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४२२/२०२३ दिनांक - ०९/१२/२०२३

## किडनॅप करुन खंडणी मागण्याचा बनाव करुन पोलीसांची दिशाभुल करणाऱ्या इसमास २ तासात ताब्यात घेण्यास वालीव पोलीस ठाण्याचे पथकास यश.

दिनांक ०८/१२/२०२३ रोजी तक्रारदार नामे नन्नेलाल रामचरण यादव, रा.ठी. शांतीनगर, फादरवाडी, वसई पुर्व, पालघर (मिसींग मुलाचे वडील) यांनी वालीव पोलीस ठाण्यात येवुन कळविले की, त्यांचा मुलगा नामे अंकीतकुमार नन्नेलाल यादव, वय २० वर्ष हा दिनांक ०७/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०७.३० वा. चे सुमारास राहते घरातुन कोठेतरी निघुन गेलेबाबत वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दिली म्हणुन मनुष्य मिसींग क्र. २०३/२०२३ दिनांक ०८/१२/२०२३ रोजी अन्वये दाखल करण्यात आली होती.

सदर मिसींग तपास पो.हवा./ रुस्तुम राठोड हे करीत असतांना तपासादरम्यान हरविलेला मुलगा याने त्याचे मोबाईलवरुन वडीलांना फोन करुन सांगितले की, त्यास तीन अनोळखी लोकांनी किडनॅप केले असुन सदर अनोळखी इसमांना रु. ३०,०००/- रक्कम खंडणी न दिल्यास जिवे ठार मारणार असल्याचे सांगितले. त्यासाठी त्याच्या मोबाईल वरुन युपीआय स्कॅनरचा फोटो पाठवुन त्यावर पैसे पाठविण्यास सांगितले.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन वरीष्ठ पोलीस निरीक्षक/जयराज रणवरे यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी ४ पथके तयार करुन मिसींग मुलाचे शोधकामी वसई, विरार, नालासोपारा, इत्यादी परीसरात रवाना करण्यात आली. सदर पथक हे तांत्रिक मदतीच्या आधारे वसई फाटा परीसरामध्ये शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेतले व त्याच्याकडे चौकशी केली असता त्यास पैशांची आवश्यकता असल्याने त्यानेच किडनॅप होवुन खंडणी मागण्याचा बनाव केल्याची माहिती दिली. त्यानंतर सदर मिसींग मुलास सुखरुप त्याचे वडीलांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. संदेश राणे, रंजित नलावडे, गुरुदास मोरे, पो.हवा/मुकेश पवार, मनोज मोरे, रुस्तुम राठोड, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

**----------00000----------**